Volume - 3 (2023)
Issue - 1 (February)

**LIBRARY SCHOLAR**
*International Peer-Reviewed Journal of Library Science*

ISSN
2583-2549

# प्राध्यापकांना संशोधनासाठी मिळणाऱ्या ग्रंथालयीन सेवा

**प्रा. विजय आर गायकवाड**
स्व. पुष्पादेवी पाटील कला व
विज्ञान महाविद्यालय रिसोड
email :- gaikwadvijay.209@gmail.com

---

**प्रस्तावना:**

महविद्यालयातील ग्रंथालयाचे वाचक हे विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधन करणारे विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी व इतर वाचक असतात. विद्यार्थी, प्राध्यापकांना ग्रंथालयात वेगवेगळ्या प्रकारच्या सेवा दिल्या जातात. त्यासाठी ग्रंथालय हे जास्तीत जास्त वेळ उघडे असावेत. महाविद्यालयीन ग्रंथालय कक्ष हा 16 ते 24 तास अभ्यासिका साठी उघडा ठेवावा. त्याचबरोबर प्राध्यापक संशोधकांसाठी विशेष कुबिकल्सची सोय उपलब्ध करून देण्यात यावी. की जेणे करून त्या संशोधक प्राध्यापकांचा वेळ वाया जाऊ नये.

व्याख्या :

**ग्रंथालय**

ग्रंथ व ग्रंत्थेतर साहित्य ज्या जागेवर जतन व संग्रह करून ठेवल्या जाते त्या ठिकाणास ग्रंथालय असे म्हणतात.

**प्राध्यापक**

महाविद्यालयात वर्गात जाऊन अध्यापन व अध्ययन करणारे हे प्राध्यापक असतात.

**ग्रंथालयात प्राध्यापकांना देण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या प्रकारच्या सेवा**

### 01) आंतर ग्रंथालयीन सेवा :-

महाविद्यालयीन ग्रंथालयाने प्राध्यापकांना एम फिल, पी एच डी करण्यासाठी तसेच वेगवेगळे रिसर्च पेपर जर्नल्स मध्ये लिहिण्यासाठी त्याचबरोबरच अध्यान व अध्यापन करण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे वाचन साहित्य ऊपलब्ध करून दिले पाहिजे. त्यासाठी प्रत्येक प्राध्यापकांच्या ठराविक कालमर्यादा देऊन महाविद्यालया मधील ग्रंथालयात त्यांना सभासद करून घेणे किंवा कायम स्वरुपी सदश्यत्व देणे व त्यांना लागणाऱ्या सर्व प्रकारच्या आंतर ग्रंथालयीन सेवा उपलब्ध करून देणे. जेणेकरून त्यांना संशोधन करण्यास सोपे जाऊन कसलीच अडचण येऊ नये.

### 02) अभ्यासक्रमातील ग्रंथसूची :

विद्यापीठाने निर्धारित केलेला अभ्यासक्रम असतो व या अभ्यासक्रमांशी संबंधित वाचन यादी विद्यापीठ महाविद्यालयीन ग्रंथालय वाचकांना उपलब्ध करून देते ती यादी महाविद्यालय प्राध्यापक संशोधकांच्या मागणीनुसार सूक्ष्म विषयावरील त्या संबंधित महविद्यालय विषय सूची तयार करून प्राध्यापकांसाठी उपलब्ध करून देतात. ग्रंथाच्या यादीचा लाभ किंवा सूचीचा लाभ प्राध्यापक वाचकांना होतो त्याचबरोबर संशोधक प्राध्यापकासाठी महाविद्यालयाद्वारे नवीन येणाऱ्या पुस्तकांची ग्रंथसूची सुद्धा ग्रंथपाल तयार करतात व त्या संबंधित वाचक प्राध्यापकास पुरवीतात. याच सूचीचा लाभ सर्व वाचक प्राध्यापक यांना होतो त्याद्वारे ते आपल्या संशोधनाला चालना देतात.

### 03) संदर्भ सेवा :

मार्गारेट हचिन्स यांच्या मते, ' 'कोणत्याही हेतूने ग्रंथालयात माहिती शोधण्यासाठी आलेल्यावाचकाला दिलेले प्रत्यक्ष व्यक्तिगत साहाय्य म्हणजे संदर्भ सेवा होय. डॉ.एस. आर. रंगनाथन यांच्या मते ' 'योग्य वाचक व त्याला हवा असलेला ग्रंथ यांची व्यक्तिगतरीत्या योग्य वेळी सांगड घालून देणे म्हणजे संदर्भ सेवा होय. संदर्भ सेवा ही ग्रंथालयातील प्राध्यापकांना देण्यात येणारी महत्त्वाची सेवा आहे या सेवेद्वारे प्राध्यापकांना वाचन साहित्यासाठी खूप मदत होते. वेगवेगळ्या संदर्भ ग्रंथातून

माहिती उपलब्ध होते. ही माहिती किंवा वाचन साहित्य इतरत्र कुठे मिळाले नाही ते संदर्भ ग्रंथातून उपलब्ध होते व अशीच सेवा संदर्भ ग्रंथाद्वारे ग्रंथालयातून प्राध्यापकांना त्यांच्या संशोधनासाठी पुरवली जाते.

### 04) प्रलेखन सेवा :

महाविद्यालयीन ग्रंथालयाद्वारे वाचक प्राध्यापकास दाखल नोंद यादी, नियतकालिकांच्या अनुक्रमाणिका पृष्टांच्या झेरॉक्स, नवीन वाचन साहित्याचे प्रदर्शन, प्रलेखन याद्या व इतर अशा वेगवेगळया प्रकारच्या प्रचलित जागरूकता सेवाग्रंथालयातून पुरविल्या जातात.

### 05) निवडक माहिती प्रसारण सेवा :

प्राध्यापकांना अभ्यासासाठी किंवा आपल्या संशोधनासाठी काही विशिष्ट माहिती ग्रंथालयामधून लागते ही माहिती वेगवेगळ्या प्रकारची असू शकते. तर त्यासाठी महाविद्यालयीन ग्रंथालयात अशा प्राध्यापक वाचक संशोधनासाठी निवडक माहितीचे प्रसारण सेवा पुरविल्या जातात.

### 06) सारस्वरूप माहिती सेवा :

या सेवेअंतर्गत नुकत्याच प्रकाशित झालेल्या नियतकालिकांतील लेख, संशोधन, अहवाल, पेटंटस्, मानके, प्रबंध, संशोधन प्रकल्प, परिषदांमध्ये सादर केलेले संशोधनपर निबंध इत्यादींचा थोडक्यात सारांश संबंधित प्रलेखांच्या सूचीय तपशीलासहएकत्रितरित्या संकलित करून प्राध्यापक वाचकांपर्यत सारस्वरूप
नियतकालिकांमार्फत प्रसारित केले जातात. उदा., केमिकल ॲबस्ट्रॅक्टस्, फिजिक्स ॲबस्ट्रॅक्टस्, बायोलॉजिकल ॲबस्ट्रॅक्टस्, लायब्ररी अँड इन्फरमेशन सायन्स ॲबस्ट्रॅक्टस् इत्यादी. संगणक युगामध्येसारस्वरूप नियतकालिकांचेरूपांतर डेटाबेसमध्ये झालेले आहे. यामुळे माहितीशोधहा संगणकाद्वारे जलदगतीने ऑनलाइन अथवा ऑफलाइन पद्धतीनेही केला जातो. अशा प्रकारची सेवा दिल्या जाते.

### 07) विस्तारित सेवा :

यासाठी वाचकांकरिता ग्रंथालयाची संपूर्ण माहिती दिल्या जाते. यामध्येग्रंथालयातील विविध विभाग, विभागवार ठेवलेले ग्रंथ, विविध प्रकारची वाचन साधने, त्यांची कपाटातील रचना, त्यात कोणत्या स्वरूपाची माहिती मिळते, त्यातील माहिती कशी शोधावी, तालिकेतून ग्रंथाविषयी माहिती कशी शोधावी, डेटाबेसेसमधून माहिती कशीशोधावी या विषयी प्राध्यापक वाचकांना प्रशिक्षण दिले जाते. शक्यझाल्यास छापील स्वरूपातील ग्रंथालयाची नियमावली व माहिती पुस्तिका प्राध्यापक वाचकांमध्ये वितरीत केली जाते.लायब्ररी गाईडची निर्मिती करून अशा पद्धतीनेग्रंथालयाची ओळख करून दिली जाऊ शकते.

### 08) ग्रंथालय आऊटरीच सेवा :

अशा ग्रंथालय सेवा ज्या महाविद्यालये संस्थेच्या आवाराबाहेरील समूहापर्यंत पोहचवणे. बरीच विद्यापीठे आणि महाविद्यालयेआपल्या कक्षेबाहेर (परिसराबाहेर, out of campus) जाऊन प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना नवनवीन सेवा देण्यावर भर देतात. सार्वजनिक ग्रंथालये अशा सेवांद्वारे सामान्य नागरिकांना ग्रंथालय सभासद होण्यासाठी प्रोत्साहित करतात. तर अशा ग्रंथालयाशी महाविद्यालयीन ग्रंथालय एम.ओ.यु. याद्वारे माहितीचे आदान प्रदान करून आपल्या महाविद्यालयातील संबंधित प्राध्यापकास अवगत करतात व अशा प्रकारची सेवा त्यांना दिल्या जाते.

### 09) सोशल नेटवर्किंग सेवा :

सोशल नेटवर्किंग साईटस्वेब-आधारित असतात. यांच्या आधारे महाविद्यालयीन ग्रंथालये प्राध्यापकवाचकांना इंटरनेटवर विविध प्रकारच्या सेवा प्रदानकरतात. ग्रंथालयातील वाचन साधने, सेवा सुविधा, उपक्रम आणि कार्यक्रम इत्यादींविषयी वाचकांना अवगत करतात. यासाठी ई-मेल, इन्स्टंट मेसेजिंग, फेसबुक, ट्विटर, माय स्पेस, लिंक्ड-इन या सोशल नेटवर्किंग टूल्सचा वापर केला जातो. अशा प्रकारच्या सेवा ग्रंथालयाद्वारे प्राध्यापकांना देत असतात.

## 10) भाषांतर सेवा:

या प्रकारची सेवा ग्रंथालयामधून प्राध्यापकांना मिळत असते. यामध्ये उदाहरणार्थ जर एखादा प्राध्यापक मराठी या विषयाचा असेल व त्यांनी घेतलेले पुस्तके माहितीसाठी इंग्लिश मधून असेल व त्या प्राध्यापकास माहिती मराठी मधुन हवी असेल तर त्या पुस्तकाचे भाषांतर करून त्याला मराठीमध्ये उपलब्ध करून देण्याची सेवा ग्रंथालयद्वारे पुरविली जाते की जेणेकरून त्या संबंधित वाचक प्राध्यापकास अध्ययन व अध्यापन करताना अडचण येणार नाही.

## 11) प्रतीलीपी सेवा :

महाविद्यालय ग्रंथालय प्राध्यापक वाचकांना प्रतिलिपी सेवा बरोबर इतरही सेवा सुविधा पुरविते. तसेच मायक्रोफॉर्मच्या स्वरूपातील वाचन साहित्य वाचण्याची सुविधाही पुरविते. तसेच वाचन साहित्याच्या मायक्रोफॉर्मच्या स्वरूपातील तसेच सामान्य स्वरूपातील प्रति मिळविण्याची सुविधाही महाविद्यालय ग्रंथालय त्यांना देते.

## 12) इंटरनेट सेवा :

संगणकीकरण केलेले महाविद्यालय ग्रंथालय वाचकांना ओ.पी.ए.सी. ची सुविधा पुरवितात. पुण्या मुंबईसारख्या शहरात ग्रंथालयाचे नेटवर्क अधिक प्रमाणात कार्यरत असते. त्यासाठी संशोधक प्राध्यापकास पाहिजे असलेले वाचन साहित्य त्या महाविद्यालयातील ग्रंथालयात उपलब्ध नसल्यास ते इतरमहाविद्यालयाच्या ग्रंथालयात शोधण्यासाठी महाविद्यालय ग्रंथालय लायब्ररी नेटवर्कचा वापर करतात. तसेच जगातील विविध डेटाबेस मधील माहितीही इंटरनेटच्या साह्याने महाविद्यालयीन ग्रंथालय प्राध्यापक वाचकांना मिळवून देतात.

## 13) मागणी आधारित माहिती सेवा :

यामध्ये प्राध्यापक वाचकांनी मागणी केल्यानंतर त्यांच्या माहितीविषयक समस्या सोडविण्यासाठी ज्या सेवा दिल्या जातात त्यांना मागणी आधारित माहिती सेवा असे म्हणतात. यामध्ये वेगवेगळ्या प्राध्यापकांना त्यांच्या संशोधनाच्या माहितीनुसार या संदर्भ सेवा लागत असतात त्या ग्रंथालयाकडून त्यांना उपलब्ध करून दिल्या जातात.

## 14) वाङ्मय शोध सेवा :

महाविद्यालयीन प्राध्यापक व संशोधक त्यांच्या संशोधन विषयावरील सर्व वाचन साहित्याची मागणी ग्रंथपाल कडे करीत असतात या अशा वाचकांनामहाविद्यालयीन ग्रंथपाल ग्रंथालयातून वेगवेगळ्या प्रकारच्या त्यांच्या विषयाशी संबंधित वाङ्मय शोध सेवा पुरवितात या सेवेमध्ये मागणी केलेल्या विषयावरील माहिती ज्या ज्या वाचन साहित्यात उपलब्ध आहे तेथे सर्व वाचन साहित्य शोधून संबंधित वाचक प्राध्यापकास त्याच्या संशोधनासाठी दिली जाते.

## सारांश:

ग्रंथालयातील कोणतेही कामकाज योग्य नियोजनाने केले तर त्याचे यश हे मिळतेच त्यामुळे योग्य नियोजनाने महाविद्यालयात दिल्या जाणाऱ्या व उपलब्ध असणाऱ्या वेगवेगळ्या सेवा संबंधित संशोधक संशोधनासाठी प्राध्यापक वाचकांना दिल्या जातात. व त्याचा फायदा त्यांना त्यांच्या संशोधनासाठी होतो. महाविद्यालयातील ग्रंथालयात दिलेल्या सेवामुळे संबंधित वाचक प्राध्यापकाचे संशोधनाचे महत्त्वाचे कार्य पार पाडल्या जाते. तसेच त्यांना महाविद्यालयांनी दिलेल्या सेवेबद्दल तृप्त होतात व आभार मानतात. एकंदरीतच वरील प्रकारच्या सर्व सेवा प्रत्येक महाविद्यालयातील ग्रंथालयातून संबंधित संशोधक प्राध्यापकास दिल्या जातात. त्याचा फायदा त्यांना आपल्या संशोधनात मोठ्या प्रमाणावर होतो.

## Reference :

१. यरोळकर, यमून शिवाजी आणि यरोळकर, गंगा शिवाजी (२०१२) संशोधन कार्यात माहिती संप्रेषण तंत्रज्ञान व संशोधकांची भूमिका. Lokavishkar International E-Journal, I (IV), 1-4

२. रिसवडकर म.रा. (2009) ग्रंथालय आणि माहितीशास्त्राची संशोधन पध्दती पुस्तक०१ यचममुवि नाशिक

**LIBRARY SCHOLAR**
*International Peer-Reviewed Journal of Library Science*
ISSN
2583-2549

३. Bilwara B.I and Pujara S.M. (2016). Impact of e-information literacy oninformation seeking behavior of university teachers. Annals of library andinformation studies, 63.pp.176-181.
४. Pathade N.S. and Sagar R.H. (2014) E information literacy program for the teachers of Nagnath Art's, Commerce & Science college AundhaNagnath Included in Libraries from palm leaf to palm tips, National conference held on 13-14 /dec 2014 at Phusding Naik Mahavidyalaya, Pusad.
५. www.sgbau.ac.in.
६. www.merriam-webster online dictionary.